# श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ,

१, ना. ठा. मार्ग, न्यु मरिन लाईन्स्, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

Website : www.sndt.ac.in
Phone : +91 22 22031879

Email : specialcell@sndt.ac.in
Ext. No. : 1292, 1217


## विशेष कक्ष

जावक क्र. विशेष कक्ष/अ-०४/२०२५-२६/42

दि. ~~२१/०६/२०२५~~ २४/०७/२०२५

**परिपत्रक :**

विषय : पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेशामध्ये आरक्षणाची अंमलबजावणी करणेसंबंधात अनुसरावयाची कार्यपध्दती

संदर्भ : १) सा.प्र.विभाग, मंत्रालय शा.नि.क्र. बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दि. २३.०३.१९९४,

२) उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, शा.नि.क्र. युएसजी-१४९३/(२४२८)/विशि-४, दि. २३.०६.१९९४,

३) सा.प्र.विभाग, मंत्रालय शा.नि.क्र. बीसीसी-१०९४/सीआर-५७/९४/१६-ब, दि. ०५.१२.१९९४,

४) उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, शा.नि.क्र. युएसजी-१४९४/१६११४/(२९०३)/विशि-४, दि. १९.०१.१९९५,

५) महाराष्ट्र (प्रवेशातील आरक्षण) ॲक्ट नं. XXX ऑफ २००६, दि. ०१.०८.२००६,

६) विद्यापीठ अनुदान आयोगाची पत्रं क्र. No. F 1-5/2006(SCT), दि. 25.08.2006 आणि D.O. No. F 1-27/2008(SCT), दि. 24.11.2008,

७) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. बीयुसी-२००९/(२३/९) मशि-५, दि. २३.०१.२००९

८) महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि., शा.नि.क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२/०२/२०१९,

९) महाराष्ट्र (सा.शै.मा.व. आरक्षण)ॲक्ट नं. XVI ऑफ २०२४, दि. २६.०२.२०२४,

१०) विद्यापीठाच्या शैक्षणिक परिषदेचा दि. २३/१२/२०२४ च्या मिटींग मधील अजेंडा क्र. ०३ चा निर्णय.

महोदय/महोदया,

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य शासन यांच्या वरनिर्दिष्ठ संदर्भीय निर्देशपत्रं/शासनपत्र/शासन निर्णय तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, शैक्षणिक संस्थांमधील सर्व अनुदानित व विना-अनुदानित (पदवी, पदव्युत्तर, एम.फील., पीएच.डी. वगैरे... सर्व) अभ्यासक्रमांतील प्रवेशामध्ये आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करणेचे निर्देश प्राप्त आहेत.

विद्यापीठातील विद्या परिषदेच्या दि. २३/१२/२०२४ च्या सभेत (अजेंडा क्र. ०३ मध्ये), विद्यापीठातील पीएच.डी. प्रवेशांसंबंधात आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय/ठराव पारित करण्यात आला आहे. याअन्वये विद्यापीठातील पीएच.डी. प्रवेशासंबंधात अनुसरावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे ;

**(१) प्रवेश समिती गठीत करणे :** प्रवेशांमध्ये आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी, प्रत्येक महाविद्यालय/विभाग स्तरावर खालीलप्रमाणे 'प्रवेश समिती' गठीत करावी आणि प्रवेश नियंत्रित करावेत. समितीवर शिक्षक / वर्ग 'अ' अधिकारी पैकी एक मागासवर्ग प्रतिनिधी नियुक्त करावा.

| अ.क्र. | समिती | गठीत समिती /संबंधीतांची नावे | सद्या ज्या पदावर कार्यरत आहे त्याचे पदनाम | सही व दुरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष | | | |
| २. | सदस्य | | | |
| ३. | सदस्य | | | |
| ४. | सदस्य | | | |
| ५. | मागासवर्ग प्रतिनिधी | | | |

**(२) महाराष्ट्र राज्य शासनाचे प्रवेशासंबंधातील प्रचलित आरक्षण धोरण :** शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित आरक्षण धोरणानुसार, अराखीव व मागास प्रवर्गांकरिता खालीलप्रमाणे आरक्षण टक्केवारी लागू आहे ;

| अ.क्र. | आरक्षणाचा प्रवर्ग | (Open/Reserved Category) | आरक्षण टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| ०१. | अराखीव (खुला) | (Unreserved/Open to All) | | ३० % |
| ०२. | अनुसूचित जाती | (Scheduled Caste) | | १३ % |
| ०३. | अनुसूचित जमाती | (Scheduled Tribe) | | ०७ % |
| ०४. | विमुक्त जाती (अ) | (De-notified Tribes-A) | ०३ % | ११ % |
| ०५. | भटक्या जमाती (ब) | (Nomadic Tribes-B) | २.५ % | |
| ०६. | भटक्या जमाती (क) | (Nomadic Tribes-C) | ३.५ % | |
| ०७. | भटक्या जमाती (ड) | (Nomadic Tribes-D) | ०२ % | |
| ०८. | इतर मागासवर्ग | (Other Backward Class) | | १९ % |
| ०९. | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | (Economically Weaker Section) | | १० % |
| १०. | सा.शै.मा.व. | (Socially and Educationally Backward Class) | | १० % |
| -- | | एकुण | | १०० % |

टिप : १) उपरोक्त अ. क्र. ०४ ते ०७ (विमुक्त जाती व भटक्या जमाती) चे आरक्षण 'अ' 'ब' 'क' 'ड' या प्रवर्गात अंतर्गत परिवर्तनीय (Internally transferrable) राहील.

२) उपरोक्तपैकी सा.शै.मा.व. या प्रवर्गासाठी असलेले १० टक्के आरक्षण/प्रवेश हे, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. ३४६८/२०२४ व इतर... संबंधात मा. न्यायालयाच्या पुढील निर्णयाच्या अधिन असतील.

(३) **गाईड निहाय प्रवेश क्षमतेवर प्रचलित आरक्षण धोरणाप्रमाणे कार्यवाही करणे :** पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी मान्यताप्राप्त गाईड निहाय (म्हणजेच, प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक निहाय) प्रवेश क्षमता विचारात घेऊन आरक्षणाची अंमलबजावणी करावी. प्रत्येक गाईडच्या प्रवेश क्षमतेच्या ३० टक्के जागा अराखीव व ७० टक्के जागा मागासप्रवर्गांना/राखीव प्रवर्गांना आरक्षित कराव्यात. यास्तव उपरोक्त मुद्दा क्र. (२) मधील प्रवर्गनिहाय आरक्षण टक्केवारीप्रमाणे, मान्यताप्राप्त गाईडसाठी आरक्षित जागा/पदांचा तपशिल खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे ;

| अ.क्र. | मान्यता प्राप्त गाईड | प्रवेश क्षमता | जागांचे आरक्षण |
|---|---|---|---|
| १. | प्राध्यापक | ०८ जागा | अराखीव-०२ (कायमस्वरूपी),<br>अनु.जाती-०१ (कायमस्वरूपी),<br>अनु.जमाती-०१ (कायमस्वरूपी),<br>विजा(अ)-०१ (तद्नंतर भज-ब, भज-क, भज-ड या क्रमाने आळीपाळीने),<br>इ.मा.व.-०१ (कायमस्वरूपी),<br>साशैमाव-०१ (कायमस्वरूपी),<br>आदुघ-०१ (कायमस्वरूपी) |
| २. | सहयोगी प्राध्यापक | ०६ जागा | अराखीव-०२ (कायमस्वरूपी),<br>अनु.जाती-०१ (तद्नंतर अनु.जमाती आळीपाळीने),<br>विजा(अ)-०१ (तद्नंतर भज-ब, भज-क, भज-ड या क्रमाने आळीपाळीने),<br>इ.मा.व.-०१ (कायमस्वरूपी),<br>साशैमाव-०१ (तद्नंतर आदुघ आळीपाळीने) |
| ३. | सहाय्यक प्राध्यापक | ०४ जागा | अराखीव-०१ (कायमस्वरूपी),<br>अनु.जाती-०१ (तद्नंतर अनु.जमाती आळीपाळीने),<br>विजा(अ)-०१ (तद्नंतर भज-ब, भज-क, भज-ड या क्रमाने आळीपाळीने),<br>इ.मा.व.-०१ (तद्नंतर साशैमाव व आदुघ या क्रमाने आळीपाळीने) |

(४) **अभ्यासक्रम निहाय पात्रताधारक विद्यार्थ्यांची 'सामाईक गुणवत्ता यादी' तयार करणे :** शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश निर्धारीत करण्यासाठी प्रथमतः अभ्यासक्रम/विषय निहाय सर्व पात्रताधारक विद्यार्थ्यांची (मागासवर्गीयांसह) 'सामाईक गुणवत्ता यादी' (Common Merit List) बनवावी. (जेवढे अभ्यासक्रम/विषय आहेत, तेवढया स्वतंत्र गुणवत्ता याद्या तयार होतील.)

२/४...

(५) **गाईड निहाय अराखीव व मागास प्रवर्गांच्या जागा/पदे भरण्याची कार्यपध्दती :** उपरोक्त मुद्दा क्र. (३) मध्ये दर्शविल्याप्रमाणे, मान्यताप्राप्त गाईड निहाय अराखीव व मागासप्रवर्गांच्या जागा/पदे प्रत्यक्षात भरण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करावी ;

(अ) **अराखीव वर्गाच्या जागा सर्वप्रथम भराव्यात :** प्रत्येक गाईडच्या जागा भरतेवेळी, त्या गाईडच्या अराखीव जागा प्रथम भराव्यात. त्याकरीता उपरोक्त मुद्दा क्र.(४) प्रमाणे तयार केलेल्या (संबंधित अभ्यासक्रमाच्या/विषयाच्या) 'सामाईक गुणवत्ता यादी' मधील सुरूवातीच्या (उच्चतम गुणवत्तापासून) विद्यार्थ्यांची निवड करावी. या निवडलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मागासप्रवर्गातील उमेदवार/विद्यार्थी उपलब्ध असल्यास, त्यांना अराखीव/खुल्या वर्गातूनच प्रवेश देण्यात यावेत.

(ब) **प्रत्येक राखीव/मागास प्रवर्गाच्या रिक्त जागा/पदे भरण्याची कार्यपध्दती :** उपरोक्त मुद्दा क्र. (५)(अ) प्रमाणे अराखीव/खुल्या वर्गाच्या जागांसाठी निवड झालेल्या, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्यानंतर खालोखाल जे मागासवर्गीय उमेदवार/विद्यार्थी उपलब्ध आहेत, त्यांच्या 'मागासप्रवर्ग निहाय स्वतंत्र याद्या' तयार कराव्यात. (जसेकी, अनु.जाती, अनु.जमाती, वि.जा.-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, इमाव, सा.शै.मा.व. आणि आ.दु.घटक याप्रमाणे...) सदर याद्या त्या-त्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता/गुणांकानिहाय असतील. या याद्यांमधून त्या-त्या मागासप्रवर्गाच्या जागा भरण्याची कार्यवाही करावी.

६) **विशिष्ट वर्षी मागास प्रवर्गाचा उमेदवार/विद्यार्थी गुणवत्ता यादीत उपलब्ध नसेल, अशावेळी करावयाची कार्यवाही :** शासन निर्देशांनुसार, मागास प्रवर्गांच्या राखीव जागा त्या-त्या संबंधित प्रवर्गाच्या उमेदवाराद्वारे भरणे आणि आरक्षण धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. परंतू त्या-त्या संबंधित मागासप्रवर्गाचा उमेदवार मिळत नसल्यास, संबंधित गाईडने आणि गठीत केलेल्या प्रवेश समितीने खालीलप्रमाणे कार्यवाही करणे, अपेक्षित आहे.

(अ) **संबंधित गाईडने करावयाचे प्रयत्न :** प्रत्येक मान्यताप्राप्त गाईडने मागासप्रवर्गाचे उमेदवार मिळण्यासाठी विशेष प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. यामध्ये रिक्त प्रवर्गांच्या जागांची विविध माध्यमांद्वारे जाहिरात व प्रसिध्दी करणे, महाविद्यालय/विभागांना भेट देणे, विद्यार्थ्यांचे समुपदेशन करणे, विद्यार्थी/शिक्षक-शिक्षकेत्तर संघटना/ मागासवर्गीयांच्या संघटना/ परिषदा वगैरे.. यांच्याकडून विद्यार्थी उपलब्ध होण्याबाबतचे प्रयत्न करणे इत्यादी... तसेच पुर्वनियोजन करणे अत्यावश्यक आहे.

(ब) **प्रवेश समितीने करावयाची कार्यवाही :** पीएच.डी. अभ्यासक्रमांत विद्यार्थीनींची नोंदणी/प्रवेश निश्चित झाल्यापासून, पीएच.डी. पूर्ण होईपर्यंत किमान ०३ वर्ष कालावधी लागतो. त्यामुळे मागासवर्गीयांची रिक्त जागा अराखीव उमेदवाराने भरू नये. तसे केल्यास, संबंधित अराखीव उमेदवाराची पीएच.डी. पूर्ण होईपर्यंत ती जागा भरलेली राहील व त्याची पीएच. डी. पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीदरम्यान (किंवा लगत दुस-या वर्षी) त्या मुळ राखीव मागासवर्गाचा पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यास त्या मागासवर्गीय उमेदवाराला प्रवेश नाकारला जाऊ शकतो. त्याला वाट पाहावी लागेल, त्याच्यावर अन्याय होण्याची शक्यता आहे.

तथापि, एखाद्या विशिष्ट वर्षी मागासप्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध होत नसल्यास, विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र राज्य शासनाने मागास प्रवर्गांच्या गटांमधील अन्य प्रवर्गातून गुणवत्तेनुसार अदलाबदलीने (Interchangeability ने) जागा भरण्याची तरतुद खालीलप्रमाणे केलेली आहे ;

| | | |
|---|---|---|
| गट १ | अनु.जाती आणि अनु.जमाती | या प्रवर्गामध्येच अदलाबदल करावी. |
| गट २ | विजाभज 'अ' 'ब' 'क' 'ड' आणि इतर मागासवर्ग | या प्रवर्गामध्येच अदलाबदल करावी. |

वरनिर्दिष्ठ मागास प्रवर्गातून अदलाबदलीने जागा भरण्याची कार्यवाही करताना, अदलाबदलीच्या दुस-या प्रवर्गाचा उमेद्वार/विद्यार्थी उपलब्ध नसल्यास अशा जागा रिक्त ठेवाव्यात. कोणत्याही मागासप्रवर्गाची जागा अराखीव वर्गाच्या उमेदवाराद्वारे भरू नये. संबंधित मागास प्रवर्गाची रिक्त जागा आरक्षण अनुशेष म्हणून पुढे ओढण्यात येईल, याची दक्षता प्रवेश समितीने घ्यावी. तसेच, संबंधित मागास प्रवर्गाचे उमेदवार मिळण्यासाठी नियोजन व प्रयत्न चालू ठेवावेत.

**सर्वसाधारण सूचना :**

❖ प्रत्येक गाईडने वरनिर्दिष्ठ मुद्दा क्र. ३ मध्ये दर्शविलेले जागांचे आरक्षण विचारात घेऊन, परिपत्रकासोबतच्या प्र-पत्र 'अ' मध्ये स्वत:ची माहिती नेहमी अद्ययावत स्वरुपात ठेवावी. तसेच प्रवेश समितीला वेळोवेळी अवगत करावी.

❖ गाईडच्या रिक्त जागा भरतीची जाहिरात प्रसिध्द होण्यापूर्वी प्रत्येक गाईडने आपलं प्रपत्र-अ (मुळ प्रत) विद्यापीठाच्या पीएचडी सेलला जमा करावे किंवा संबंधित विषयांच्या विभागप्रमुखांमार्फत जमा करावीत. पीएचडी सेलने सर्व गाईडच्या प्रपत्र-अ च्या प्रती एकत्रित स्वरूपात विशेष कक्षाला पाठवून आरक्षण तपासणी करून घ्यावी.

❖ प्रवेश समितीमधील मागासवर्गीयांच्या प्रतिनिधीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संबंधात गुणवत्ता यादी, शैक्षणिक पात्रतेत सुट/सवलत (असल्यास) तसेच आरक्षणाच्या अंमलबजावणी वगैरे... बाबींकडे काटेकोरपणे लक्ष ठेवावे. नियमानूसार कार्यवाही करणेस काही अडचणी येत असल्यास, विद्यापीठाच्या विशेष कक्षाला संपर्क करावा.

❖ केंद्र शासन/युजीसी व राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती / फेलोशिप योजनांसंदर्भात विद्यार्थीनींना अवगत करावे.

❖ समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, मंत्रालय यांचा शा.नि.दि. ०१/११/१९८५ आणि शा.नि. दि. २४/०८/१९९५ नुसार महाराष्ट्र राज्याबाहेरील (अन्य राज्यातून स्थलांतरित होऊन आलेल्या) विद्यार्थ्याला (जरी तो बाहेरच्या राज्यात मागासप्रवर्गात मोडत असेल तरी त्याला) महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीयांच्या आरक्षणाच्या सवलती देय नाहीत. त्यामुळे अशा विद्यार्थ्याला मागासवर्गीयांच्या राखीव जागेवर प्रवेश देऊ नये. त्याचा अराखीव/खुल्या वर्गाच्या जागेसाठी विचार करण्यात यावा.

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठातील पीएच.डी. प्रवेशासंबंधात वरीलप्रमाणे विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा. विद्यापीठाच्या मा.कुलगुरू यांच्या आदेशानुसार सदर परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

कळावे.

आपला,

(डॉ. विलास नांदवडेकर)
**कुलसचिव**

**सोबत :** गाईडनिहाय माहिती तयार करण्यासाठी नमुना (प्र-पत्र 'अ')

**प्रती,**
मा. प्राचार्य/संचालक/प्रभारी/विभागप्रमुख,
विद्यापीठाचे पदव्युत्तर विभाग, सेंटर, इंस्टिट्यूट,
विद्यापीठ संचलित व संलग्न महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ, मुंबई

**प्रत माहितीस्तव सादर :** १) मा. कुलगुरू यांचे कार्यालय
२) मा. प्र-कुलगूरू यांचे कार्यालय
३) मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, जुहू आवार
४) प्रभारी, विद्यापीठ पीएच.डी. सेल, चर्चगेट
५) विद्यापीठ शैक्षणिक विभाग, चर्चगेट
६) विद्यापीठ संलग्नता विभाग, चर्चगेट
७) विद्यापीठ सचिवालय, चर्चगेट

# प्र-पत्र 'अ'

## मान्यताप्राप्त गाईड-निहाय प्रवेश / नोंदणी प्रक्रिया पुर्ण झालेल्या विद्यार्थीनींची माहिती

मान्यताप्राप्त गाईडचे नांव : ______________________ गाईडचा स्तर/पदनाम : **प्राध्यापक** विषय : ______________

संपर्क क्र. ______________ ई-मेल : ______________________ प्रवेश क्षमता/मंजूर जागांची संख्या : **०८ (आठ)**

| आरक्षणाचा गोषवारा | | | | | रकाना ३ मध्ये दर्शविलेल्या (भरलेल्या जागा बाबतची) विद्यार्थीनींची माहिती | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | आरक्षित/ आवश्यक जागा | भरलेल्या जागा | रिक्त जागा | जादा भरलेल्या जागा | संबंधित विद्यार्थीनीचे नांव | विद्यार्थीनीचा स्वत:चा जात प्रवर्ग | पीएच.डी. करीता प्रवेश/नोंदणी केल्याचा दिनांक | मागास प्रवर्गांमध्ये **अदलाबदलीने** किंवा **विजाभज अंतर्गत परिवर्तनाने** जागा भरली आहे का ? | रकाना ५ मधील जादा भरलेल्या जागां बाबतचा खुलासा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| अ.जाती | ०१ | - | - | - | १) | | | | |
| अ.जमाती | ०१ | - | - | - | १) | | | | |
| विजाभज | ०१ | - | - | - | १) | | | | |
| इमाव | ०१ | - | - | - | १) | | | | |
| साशैमाव | ०१ | - | - | - | १) | | | -- | |
| आ.दु.घटक | ०१ | - | - | - | १) | | | -- | |
| अराखीव | ०२ | - | - | - | १) | | | -- | |
| | | | | | २) | | | -- | |
| **एकुण** | **०८** | - | - | - | -- | -- | -- | -- | |

**टिप :** उपरोक्त प्र-पत्र नमुना 'प्राध्यापक' स्तरावरील गाईडसाठी वापरण्यात यावा. परिपत्रकातील मुद्दा क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक स्तरावरील गाईडचे जागांचे आरक्षण विचारात घेऊन याच प्रपत्रामध्ये त्यांनी आपली माहिती अद्ययावत/तयार करावी.

**दिनांक :**

**(मान्यताप्राप्त गाईडची स्वाक्षरी)** **(प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख/प्रभारी यांचे नाव, सही व शिक्का)**